ISSN 2349 - 5618

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
YEARLY RESEARCH JOURNAL

# Re-Construction
# Mahatma Jyotiba Phule

Volume - I Issue - I April 2014



Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

ISSN 2349 - 5618

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
YEARLY RESEARCH JOURNAL

# Re-construction Mahatma Jyotiba Phule

VOLUME - I ISSUE - I APRIL - 2014 AURANGABAD

• EDITOR •
**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

• PUBLISHED BY •
**Ajanta Prakashan**
**Aurangabad. (M.S.)**

Scanned by CamScanner

## Contents



| Sr.No. | Name & Author | Pages |
|---|---|---|
| ७ | महात्मा ज्योतीराव फुले : एक साहित्यिक<br>ॲड. एम.एन. शेख | 29 |
| ८ | महात्मा फुले यांचे आर्थिक विचार<br>डॉ. पाटील व्ही.एच. | 32 |
| ९ | महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार<br>प्रा. सचिन नागोराव कसबे | 36 |
| १० | समाज सुधारकातील अग्रणी महात्मा जोतीराव फुले<br>प्रा. विनोद पाटील | 39 |
| ११ | महात्मा फुले आणि सावित्रीमाई फुले स्त्री शिक्षणाचे समाजशास्त्र<br>संजय प्रल्हादराव खिल्लारे | 44 |
| १२ | आधुनिक महाराष्ट्र के संग्रामी महात्मा फुले<br>प्रा. आर. आर. सुरडकर | 47 |



'Re-Construction - महात्मा ज्योतिबा फुले' या वार्षीक प्रसिध्द झालेली मते मुख्य संपादक, संपादक मंडळ व सल्लागार मंडळास मान्य असतीलच असे नाही. या नियतकालिकात प्रसिध्द करण्यात आलेली लेखकाची मते ही त्याची वैयक्तिक मते आहेत. तसेच शोधनिबंधाची जबाबदारी स्वतः लेखकावर राहील.

हे नियतकालिक मालक, मुद्रक, प्रकाशक विनय शंकरराव हातोले यांनी अजिंठा कॉम्प्युटर ॲण्ड प्रिंटर्स, जयसिंगपूरा, विद्यापीठ गेट औरंगाबाद येथे मुद्रित व प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

# ९. महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार

प्रा. सचिन नागोराव कसबे
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे.

## प्रस्तावना

१९ वे शतक सामाजिक क्रांतीचे शतकच म्हणावे लागेल कारण १९ व्या शतकात समाजसुधारणाविषयक विविध चळवळी झाल्या प्रबोधनात्मक लेखन झाले. विविध समाजसुधारक आणि समाजचिंतक होऊन गेले. त्यात महात्मा जोतिराव फुल्यांचे स्थान आगळ्या प्रकारचे आहे आधुनिक भारतात समाज प्रबोधनाचे जे युग जन्माला आले ते ब्रिटिशसत्तेमुळे परंतु आधुनिक काळातही ज्या विचारवंताच्या कार्यामुळे या सामाजात आत्मविकासाच्या व उत्थानाच्या आकांक्षा निर्माण झाल्या. त्या महात्मा फुले यांच्यामुळेच मागच्या शतकातील पहाडा एवढे उंच दिसणारे व्यक्तिमत्व म्हणजे महात्मा फुले यांचे होय. त्यामुळे त्यांना आद्य समाजसुधारक किंवा आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक म्हटले जाते. शुद्र अतिशुद्र आणि स्त्री हे फुल्यांच्या लेखनाचे विषय होते. तसेच ते त्यांच्या कार्याचे व्यक्तिमत्त्वाचे व उद्दिष्टांचे पैलू होते. शेतीपासून ते न्यायव्यवस्थेपर्यंत ब्रिटिश काळात इंग्रजाजी एक नवी रचनाच येथे निर्माण झाली होती त्यामुळे येथील शेतकरी दारिद्रयात सापडून त्यांच्यासमोर शोषणाची समस्या निर्माण झाली व शेतीविषयी शेतकऱ्याविषयी सर्वात प्रथम *'शेतकऱ्यांचा आसूड'* या ग्रंथात कधी नव्हे कुणी नव्हे एवढे विचार त्यांनी मांडले व ते सत्यात उतरवले त्यांच्या समकालीन विचारवंतानेही कधी नव्हे एवढे विचार फुलेंनी मांडले याकरिता त्याचा जाणिव व कार्य त्यांच्या विविध कार्यातून लेखनातून आजही प्रस्तुत होताना दिसते त्यामुळे प्रस्तुत निबंधात महात्मा फुले यांच्या शेती विषयक विचारांचा आधुनिक शेती व शेतकऱ्यांच्या दृष्टिने थोडक्यात आढावा घेतला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढणारे महाराष्ट्रातील फुले हे पहिले समाजसुधारक होते त्यामुळे त्यांच्या विचाराची प्रस्तुतता आज देखील आहे.

## जिवनपरिचय

महात्मा फुले यांचा जन्म इ.स. १८२७ मध्ये झाला. त्यांचे मुळ घराणे साताऱ्याजवळ कटगुण गावाचे होते महात्मा फुलेंचे पुर्ण नाव जोतीराव गोविंदराव फुले होते त्यांचे मुळ आडनाव गोऱ्हे होते पण त्यांनी फुलांचा व्यापार केल्याने लोक त्यांना गोऱ्हे ऐवजी फुले या नावाने संबोधू लागले ज्योतिबा एक वर्षाचे असतानाच त्यांची आई चिमणाबाई यांचे निधन झाले त्यामुळे त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी त्यांचे वडील व आजी यांच्यावर येऊन पडली.

ज्योतिरावांचे प्राथमिक शिक्षण १९३४-३८ या काळात झाले. १८४० मध्ये खंडोजी नेवसे पाटील यांच्या कन्या सावित्रिबाई यांच्याशी त्यांचे लग्न झाले. त्यावेळी ज्योतिराव १३ वर्षांचे तर पत्नी सावित्री ०९ वर्षांचे होते. पुढे १८४७ साली थॉमस पेन यांचा *'राईट्स ऑफ मॅन'* नावाचा ग्रंथ त्यांच्या वाचनात आला त्यांना हिंदू समाजातील व धर्मातील विषमता ईश्वर निर्मित नसून मानवनिर्मिती आहे हे कळून आले पराजंपे नावाच्या मित्राच्या लग्नात वराती मागून जाताना एका सनातनी माणसाने त्यांना शुद्र म्हणून तेथून निघून जायला सांगितले यावर अपमानाने त्यांना जातीयवादाची तीव्रता समजली आणि शुद्राविषयी विचार त्यांच्या मनात सुरु झाले व त्यांनी आपले विचार लेखनातून स्पष्ट केले. कारण महाराष्ट्राच्या समाजसुधारकांच्या पहिल्या पिढीत जे श्रेष्ठ समाजसुधारक आणि प्रामुख्याने समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मिमांसा करणारा क्रांतीकारक विचारवंत म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले होय. त्यामुळे त्यांचे विचार प्रस्तुत निबंधात महत्त्वाचे वाटतात.

## महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार

महात्मा फुल्यांनी आपली बांधिलकी सतत उपेक्षित वर्गाबरोबर जाहिर केला. उपेक्षित वर्गात फुल्यांनी सर्वच दलित पीडित व कष्टकरी जनतेचा समावेश केली. मध्यम व कनिष्ठ प्रतिचे शेतकरी, शेतमजूर, विविध व्यवसायावर पोटभरणारे ग्रामीण कष्टकरी समाज हे सर्व उपेक्षित

Scanned by CamScanner

अनेक शतकापासून व जोखडात सापडलेली आहेत तेंव्हा स्त्री सहित सर्व कष्टकरी जनतेच्या व्यथा व त्यावरील उपाय महात्मा फुल्यांनी सांगितले आहेत.

*'शेतकऱ्यांचा आसूड'* हा महात्मा फुले यांचा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ होय श्रमीक व बहुजन समाजाच्या आर्थिक अवनतीचे उत्कृष्ट चित्र त्यांनी या ग्रंथात मांडले देशातील कष्टकरी समाज हा नेहमी उपेक्षित आहे. त्यामुळे फुल्यांनी शेतकरी कष्टकरी हा प्रतिष्ठित असला पाहिजे शेती ही उत्तम केली पाहिजे कारण फुले स्वत: शेतकरी होते शेतीबद्दल त्यांच्यात जाग्रती होती यादृष्टिने त्यांनी प्रथम विचार मांडले व ग्रामीण समुदायाला न्याय दिला गेला कारण त्यांच्यामुळे ग्रामीण समाजात जनता, त्यांचे प्रश्न व दु:ख यांना वाचा फोडण्याचे काम फुल्यांनी केले.

तत्कालिन परिस्थितीत शेतीबद्दल राजकिय उदासिनता होती नव्या सारा पद्धती व दुष्काळासाख्या आपत्तीमुळे शेतकरी वर्ग कर्जबाजारी झाला होता. इंग्रजी राजवट यामुळे गुन्हाचे प्रमाण वाढले होते. लोकसंख्या वाढली सर्व बोजा शेतीवर पडला त्यामुळे शेतीचा कस कमी उत्पन्न कमी परिणामी रोजगार कमी होऊन बेरोजगारी वाढली, शेतीचे तुकडीकरण झाले. गुरा-ढोरासाठी असणारे जंगलेही इंग्रजांनी काबील केली. शेतकरी अज्ञानी राहिला शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराकडे जाऊ लागल्या पण महात्मा फुले असे समाज चिंतक आहेत की ज्यांनी प्रथमत: शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेतले नुसते समजून घेतले नाही तर त्यावर आवाज उठवला यातून त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो.

म. फुले यांना समाजातील आजूबाजूच्या शेतकऱ्याकडे पाहताना येथे दारिद्रय व अज्ञानाने थैमान घातले आहे असे त्यांना दिसेल तसेच इंग्रजाची रयतवारी पद्धत व शेतसारा पद्धत शेतकऱ्यावर लादली तशातच लागोपाठ दुष्काळ पडत गेला इंग्रजी राजवटीमुळे अनेक संस्थांनिकाकडील सैन्य कमी झाले व त्यांचा बोजा शेतीवर पडला व शेतकऱ्याची स्थिती करूणाजनक झाली.

शेतकऱ्यांचा फायदा मारवडी सावकर व भट ब्राम्हणांनी घेतला अज्ञानी शेतकऱ्यांना भरमसाठ कर्ज देऊन ते लुबाडणूक करू लागले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तत्कालीन दु:खाचा विचार करताना ते इतिहासात शिरतात तेंव्हा त्यांच्या लक्षात येते की वर्षानुवर्ष शेतकरी दारिद्रये व दैन्यावस्थेत जगतो आहे अशा क्षनी महात्मा फुले शेतकरी शेतमजूर व कष्टकरी यांचा आक्रोश प्रकट करून ते शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकात शेती व शेतकरी यांचा समग्र व सुसंगत विचार करतात.

फुल्यानी आपल्या लेखनात केवळ शुद्र अतिशुद्र व उच्चवर्णीय यांच्यातील संघर्ष प्रकट केला असे नाही जातीव्यवस्थेच्या आड जे उच्च वर्णीय आहेत व जे आर्थिक शोषण करतात त्याचेही चित्रण केले. १८ जुलै १८८३ साली शेतकऱ्यांच्या आसूड ग्रंथात ब्राम्हणी अधिकाऱ्यांची धर्माच्या नावावर केली जाणारी लुट आर्थिक शोषण व जोडिला नैसर्गीक आपत्ती असे संदर्भ येतात स्त्री शुद्रातिशुद्राच्या ठराविक एका बाजुवर फुल्यांनी भर दिला नव्हता दैन्य व दास्य यांच्या मुळाशी ब्राम्हणी धर्मपरंपरा व धार्मिक ग्रंथतर होते पण त्याचबरोबर इंग्रजाचे धोरणही कारणीभुत होते. ब्राम्हण पुरोहित नाना प्रकारचे विधी वृत्तवैकल्य विधी, दान धर्म व पूजा सांगून त्यावर उपाय म्हणून शांती, जपतप, यज्ञ यासाठी ब्राम्हणावर हिंदूचा भरमसाठ खर्च असा त्याचा जिवनक्रम होता. त्यामुळे ब्राम्हण हे धर्म सांगून स्त्री शुद्रातिशुद्र व अतिशुद्रांना लुटत असत शेतकऱ्यांचे अज्ञान व विद्या नसणे यामुळे शेतकरी कंगाल होत असे यामुळे फुले शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथात उपोदघातात ते म्हणतात.

*"विद्येविना मतिगेली; मतीविना निती गेली; नीतीविना गती गेली ।*
*गतीविना वित्त गेले; वित्तविना शुद्र खचले; इतके अनर्थ एका अविद्येने केले।"*

एकूणच प्रचलित हिंदू धर्मव्यवस्था व त्यावरची हिंदू समाजरचना व ब्रिटिशांची शासन संस्था या सर्वांचा समुचित परिणाम म्हणजे शुद्र शेतकऱ्यांचे आणि दलितांचे सध्या दिसणारे अपारं दैन्य होय. यासाठी लोकशिक्षण उपाय सांगितला एकूनच स्त्री शुद्रातिशुद्राच्या आर्थिक अवनती मार्गातील अडथळ्यावर प्रहार केला एवढेच नाही तर त्यांनी कारणमिमांसा व उपाय सांगितले बारमाही पाणी राहण्यासाठी नद्या कालवे विकसीत करावीत, शाळेत शिकणाऱ्या मुलाला शेती संबंधी ज्ञान घ्यावे, पाण्याच्या नियोजनाची नोंद नकाशात करावी, विहिरी व कालव्यां

Scanned by CamScanner

पुर्नवसन करावे, नदी नाल्यातील सुपीक गाळ शेतकऱ्यास घ्यावा, शेतीसाठी सुपिकता व खत घालावे, जंगली जनावरापासून पीक संरक्षण करावे, ब्राम्हणांना त्यांच्या संख्येत नौकऱ्या घ्याव्यात, दुष्काळग्रस्तांना मोफत खते बि-बियाणे घ्यावे यावरून शेतकरी समाजाला दोन घास सुखाचे खाता येथील यासाठी फुलेचे विचार दुरदृष्टीचे होते.

अशा प्रकारे सामाजिक समता आर्थिक सुबत्ता, आणि निकोप एकता प्रस्थापित व्हावी यासाठी वर्षानुवर्षाच्या आर्थिक शोषणाच्या मुळाशी येथील प्रचलित आर्थिकव्यवस्था असल्याने या आर्थिक व्यवस्थेवर त्यांनी जालीम उपाय सुचवले त्यामुळे त्यांचे विचार काळाच्या कसोटीवर दिर्घकाळ टिकणारे आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

१) महात्मा फुले: 'समग्र वाङ्मय'.
२) प्रा.गं.बा. सरदार : 'फुले व्यक्ति व विचार'.
३) डॉ. ज.रा. शिंदे, 'समाज प्रबोधन पत्रिका', जाने-फेब्रु-१९८१.
४) ग.त्र्यं. माडखोलकर, 'महाराष्ट्राचे विचारधन आधुनिक महाराष्ट्राचा वारसा',
५) महात्मा फुले, 'शेतकऱ्याचा आसूड',
६) फडके य.दि., 'महात्मा फुले समग्र वाङ्मय',
७) कीर धनंजय, 'महात्मा फुले समग्र वाङ्मय',
८) भोळे. भा.ल. 'महात्मा फुले वारसा व वसा',
९) हरी नरके, 'महात्मा फुले साहित्य आणि चळवळ',
१०) फडके य.दि. 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र',
११) वाघमारे जर्नाधन, 'समाजपरिवर्तनाच्या दिशा',
१२) सोळुंके आ.ह. 'महात्मा फुले व धर्म',
१३) सोळुंके बी.बी. 'महात्मा फुले गौरवग्रंथ',
१४) Political writings.

Scanned by CamScanner